*Vol - I, ISSUE - III [April 2011]*

# मराठाकालीन युद्धे आणि शस्त्रास्त्रांचे महत्त्व

**अनिल माणिकराव बैसाणे**

इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे.

**प्रस्तावना**

शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी भारतात मुघलांचे साम्राज्य होते. मुघल सत्तेविरूद्ध बंड करून दक्षिण भारतात अनेक राज्ये स्वतंत्र झाली. उत्तर भारतात मुघलांचे वर्चस्व होते. मात्र दक्षिण भारतात बहामनी राज्य व विजयनगरचे राज्य प्रबळ होते. यात महाराष्ट्रातील बराच भूप्रदेशाचा भाग विजापूरचा आदिलषाहाकडे होता.

याकाळात शिवाजी महाराजांचे वडील शहाजी भोसले यांना चाकण, पुणे, इंदापूर आणि सुपे इत्यादी प्रदेशांची जहांगिरी मिळाली होती. मावळ्यांच्या मदतीने शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यामुळे आदिलशहाच्या किल्लेदाराचा त्यांनी पराभव करून किल्ले जिंकून घेतले. आदिलशहाला त्यांच्या सामर्थ्यांची जाणवी होऊन त्यांच्यातील संघर्ष वाढत गेला. इ.स. 1630 ते इ.स. 1707 पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज संभाजी, राजाराम व ताराबाई यांची कारकीर्द म्हणून मराठ्यांच्या इतिहासात नोंद आहे.

संपूर्ण जागाच्या इतिहासात मराठ्यांचा इतिहास हा महत्त्वपूर्ण व स्फूर्तिदायक समजला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या परिस्थितीत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ती स्थिती अतिशय प्रतिकूल अशी होती. मुस्लिम सत्तेचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न ज्या वंशांनी केला त्यात राजपूत हे सर्वश्रेष्ठ समजले जातात. यांनी सुमारे तीन शतके मुस्लिम सत्तेशी लढा दिला. मात्र त्यांना स्वतःचे असे राज्य स्थापन करता आले नाही. मराठ्यांना आपले स्वतंत्र राज्य प्रस्थपित करण्याचा पहिला मान दिला जातो.[1]

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर मराठी स्वराज्याचा झालेला विस्तार व त्याला अनुसरून मराठेशाहीची पुनर्रचना ही संरजामशाही पद्धतीवर आधारेलेली होती. त्यामुळे मराठ्यांच्या सैन्यात आमुलाग्र बदल घडून आला. मराठेशाहीचा दुसरा कालखंड थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपासून सुरू होतो.

28 फेब्रुवारी 1728 रोजी पेशवा बाजीरावाने पालखेड या ठिकाणी निजामाचा पराभव केला. यावेळी निजामाकडील तोफखाना उपयोगी ठरला नाही. पालखेड हे दुर्गम डोंगरी ठिकाण होते. याठिकाणी पाणी मिळणे देखील कठीण होते. अशा दुर्गम ठिकाणी निजाम आलेला पाहून बाजीरावाने निजामाला कोंडीत पकडले व त्याचा पराभव केला. युद्धकुशल निजामाचा पराभव थोरल्या बाजीरावाने केल्याने दिल्ली दरबारात त्याचा दसरा निर्माण केला.

## उद्‌गीर युद्ध

मराठ्यांच्या चौथाई हक्काला, त्यांच्या वर्चस्वाला निजाम उलमुल्क सतत विरोध करत होता. इ.स. 21 मे 1748 रोजी निजाम उल्मुल्क यांचा मृत्यू झाला. यामुळे निजामाच्या वारसदारात यादवी निर्माण झाली. यातून अस्थिर राजकीय परिस्थिती उद्‌भवली. म्हणून इब्राहिमखान गारदीचा तोफखाना बरोबर घेऊन सदाशिवराव भाऊने निजामाला उद्‌गीर जवळ गाठले व त्याचा 3 फेब्रुवाारी 1760 रोजी दारूण पराभव केला. यानंतर निजामअलीने तर मान्य करून त्याने 60 लाखाचा मुलूख देण्याचे मान्य केले.[2]

उद्‌गीरचे युद्ध हे नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीतील महत्त्वाचे युद्ध होते. सदाशिवरावभाऊ यांनी देखील अप्रतिम नेतृत्व कौशल्य दाखवले.

## पानिपतचे तिसरे युद्ध (14 जानेवारी 1761)

मराठ्यांच्या सैन्यात उद्‌गीर येथील युद्धाच्या प्रसंगी गारदीचा तोफखाना समाविष्ट झाला. या तोफखान्यात मराठा गोलंदाज नसून त्यात पोर्तुगीज, गारदी, मुस्लिम, ख्रिश्चन, इत्यादी जातीय लोकाचा भरणा होता. उद्‌गीरच्या युद्धामुळे मराठ्यांना सैन्यात तोफखान्याचे महत्त्व पटले होते. यापूर्वी मराठ्यांचा गनिमी कावा या युद्धतंत्रावर भर होता. मैदानी युद्धात त्यांनी घोडदळाला महत्त्व दिले.

सदाशिवराव भाऊने उद्‌गीरच्या युद्धात आपल्या कौशल्याची मराठ्यांना जाणीव करून दिली. उत्तरोतर दत्ताजी शिंदे याचा अब्दालीने पराभव केला. यातच शिंदेचा मृत्यू झाला. ही वार्ता महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांना कळाली. तेव्हा पेशवा नानासाहेबांनी सदाशिवराव भाऊच्या नेतृत्वाखाली 3000 निवडक घोडदळ व पायदळ, इब्राहिमखानाने कूच केले. 2 ऑगस्ट 1760 रोजी मराठ्यांनी दिल्लीचा ताबा घेतला. मराठे हे दोन महिने दिल्लीत मुक्कामाला होते. त्यावेळी त्यांच्याकडील अन्नधान्याचा साठा संपला होता. महाराष्ट्रातून येणारी रसद ही त्यांच्यापर्यंत पोचली नाही.

17 ऑक्टोबर 1760 रोजी कुंजपूर या ठिकाणी ठाण्यावर मराठ्यांनी हल्ला केला. यावेळी त्यांना पुष्कळ दाणागोटा मिळाला. अब्दालीने यमुना नदी ओलांडून गोविंदपंतांचा पराभव केला. त्यामुळे मराठे व गोविंदपंत यांच्यातील संपर्क खंडीत झाला.

अब्दालीच्या सैन्याच्या हालचालीवर सदाशिवराव भाऊचे लक्ष होते. अब्दाली सोनपत या गावाजवळ आलेला पाहून देखील आपल्या सैन्याचा तळ पानिपतवर हलविला. इ.स.1760 मध्ये अशारितीने दोन्ही सैन्य समोरासमोर उभे होते. शेवटी 4 जानेवारी 1761 रोजी पानिपत या ठिकाणी घनघोर युद्ध झाले.[3] इब्राहीम गारदीने हॅलो स्केअरचे युद्ध तंत्र अवलंबण्यास मराठ्यांच्या राज्यकर्त्यांना सांगितले.

स्वतः भाऊ व विश्वासराव हे हत्तीवर स्वार होऊन ते आघाडीच्या मध्यभाागी होते. व बाजार बुणगे आणि कुटुंब कबिले यांना मागील बाजू म्हणजेच सुरक्षित होते. मराठ्यांजवळ प्रामुख्याने तलवारी, भाले, काही बंदुका, ढाली, इत्यादी शस्त्रास्त्रे होती. लहान मोठ्या मिळून एकूण 200 तोफा त्यांच्याकडे होत्या. पण बहुतेक सर्व लांब पल्ल्याच्या होत्या. यावेळी अब्दालीने जंबुरी तोफांचा अचूक मारा मराठ्यांवर केला.

इब्राहिमखनाने त्यांच्या सैन्याचे जबर नुकसान केले. परंतु हॅलो स्केअर (गोलाची लढाई) हे धोरण मराठ्यांनी तंतोतत आत्मसात केले नाही. (हॅलो स्केअर म्हणजे चारीही दिशांनी तोफा व बंदुका यांचे संरक्षणकडे तयार केले जाते आणि मध्यभागी साधन सामग्री व न लढणारी माणसे होती.

युद्धात सुद्धा सदाशिवराव भाऊच्या सैन्याने नव्याने अंमलात आणलेले युद्धाचे धोरणे नीट वापरले नाही. त्यामुळे गारदीला तोफखान्याचा वापर नीट करता आला नाही. इतक्यात विश्वासरावाला गोळी लागून तो खाली कोसळला आणि युद्धाच्या जबाबदारीचे भान विसरून सदाशिवराव भाऊ गिलनीच्या सैन्यावर तुटून पडला. त्यामुळे मराठी सैन्याला आपला सेनापती दिसेनासा झाला. त्यामुळे सैन्यात गोंधळ निर्माण होऊन ते मिळेल त्या दिशेने पळत सुटले. शिवाय युद्धात पराभव झाल्यानंतरही कोणत्याही प्रकारची पूर्व योजना सदाशिवराव भाऊने केलेली नसल्याने मराठी सैन्याची अमानुष कत्तल अब्दालीच्या राखीव सैन्याने केली.[4]

पानिपतच्या युद्धात मराठ्यांचे जबरदस्त नुकसान झाले. नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीतील आणि मराठ्यांच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाची घटना व दुर्दैवी परिवर्तनकारी घटना म्हणजे पानिपतचे तिसरे युद्ध होय. या युद्धात मराठ्यांचा दारून पराभव झाल्याने त्यांच्या भारतातील सत्तेला जबरदस्त आघात बसला. त्याचेबरोबर मुघल सत्तेच्या दुर्बलतेचेही प्रदर्शन या युद्धाच्या निमित्ताने झाले. त्यामुळे भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन पाश्चात्य सत्ताधाऱ्यांनी भारतात अधिकाधिक सत्ता विस्तार करण्यास सुरूवात केली.

## राक्षसभुवनचे युद्ध (10 ऑगस्ट 1763)

मराठ्यांचा दक्षिणेतील प्रमुख शत्रू म्हणजे निजाम होय. निजामाचा व मराठ्यांचा संघर्ष बाळाजी विश्वनाथ, पहिला बाजीराव, नानासाहेब यांच्या कारकीर्दीत चालूच होता. तिसऱ्या पानिपतच्या युद्धात मराठी सैनिक प्रचंड प्रमाणात मारले गेल्यामुळे आता पुरेसे सैन्य बळ असणार नाही. या संधीचा फायदा घेण्याचे निजामाने ठरवले. म्हणून निजामाने नदीच्या पूर्वेकडील प्रदेशाची मागणी केली. ती मागणी मराठ्यांनी पूर्ण न केल्याने त्याने मराठ्यांच्या राजधानीरवर हल्ला चढविला. यावेळी गोपाळराव व जानोजी भोसले या दोघांनी निजामाचे खरे स्वरूप कळाले होते. त्यामुळे त्यांनी निजामच्या हालचालींची बातमी पेशव्याला दिली. निजामाने सुरक्षित जागी आश्रय घेण्याचे ठरवून तो औरंगाबादकडे निघाला.

10 ऑगस्ट 1763 रोजी राक्षसभुवन येथे दोघांच्या सैन्याची गाठ पडली.[5] मराठ्यांची युद्ध रचना पारंपरिक स्वरूपाची होती. तर निजामाच्या सैन्यात तोफा व बदुंकांचा भरणा जास्त होता. शत्रू तंत्रामुळे मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. निजामाजवळ शिस्तबद्ध सैन्य, तोफखाना व बंदुका, असून त्याकडे राखीव सैन्य होते. तर मराठ्यांजवळ कमी सैन्य व काही तोफा होत्या.

राक्षसभुवन येथील युद्धातील मराठ्यांना मिळालेला विजय हा महत्त्वाचा मानला जातो. कारण पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील पराभवानंतर मराठे आपले वर्चस्व स्थापन करू शकणार नारही असे मानणाऱ्यांना हा एक धक्काच होता. यामुळे राजकारणात थोरल्या माधवरावांचे वर्चस्व वाढले.

## संदर्भसूची


1. पित्रे का. ग., ***मराठ्यांचा युद्धेतिहास***, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2000, पृ. 28.
2. तत्रैव, पृ. 66–67.
3. शेजवलकर त्र्यं. शं., ***पानिपत 1761***, राजहंस प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, 1998, पृ. 73.
4. ***तत्रैव***, पृ. 94–95.
5. तांबोळी एन. एस., पवार, ***आधुनिक भारत***, निराली प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2005, पृ. 5–6.




**अनिल माणिकराव बैसाणे**
इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे.